अंबरनाथ वाहतूक उप विभागाचे हद्दीत निर्गमित करण्यात आलेली वाहतूक नियंत्रण अधिसूचना

पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर
तीन हात नाका, एल.बी.एस.मार्ग, नौपाडा, ठाणे (पश्चिम)
दुरध्वनी क्रमांक – ०२२–२५४०१०५६
Email ID – cp.thane.dcptraffic@mahapolice.gov.in

जा.क्र. पोउपआ/वावि/अधिसूचना/ ४९ /२०२६ दि. २७/०२/२०२६

–: **वाहतूक नियंत्रण अधिसूचना** :–

ज्याअर्थी, अंबरनाथ वाहतूक उपविभागाचे हद्दीत दि.२०/०२/२०२६ रोजीपासुन दि.२१/०३/२०२६ रोजी पावेतो मुस्लीम बांधवांचा पवित्र रमजान महिना असल्याने वुलन चाळ, एस.व्हि.पी. रोड, अंबरनाथ पश्चिम येथे सायंकाळी १६.०० वा.पासुन २०.०० वा.पावेतो खादयपदार्थांचा छोटा बाजार भरत असतो. सदर ठिकाणी बाजारामध्ये खरेदीकरीता मोठया प्रमाणात नागरीक गर्दी करीत आहेत. परंतु सायंकाळच्या वेळी वुलन चाळ येथे अवजड वाहनांची ये–जा सुरु असल्याने वाहुतक कोंडी तसेच एखादा अपघात होण्याची शक्यता नाकारता येत नाही. तसेच नागरीकांच्या सुरक्षेच्या दृष्टीने देखील खबरदारी घेणे आवश्यक आहे. सदर परिसरात वाहतूक कोंडी होऊ नये व परिसरातील वाहतूक सुरळीत व सुनिश्चित राहणे आम जनतेच्या सोईसाठी आवश्यक आहे.

त्याअर्थी, मी **पंकज शिरसाट, पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर** म्हणून, मला महाराष्ट्र शासन गृहविभाग क्र. एम.व्ही.ए.–११६/सीआर/३७/टीआर, दि. २७/०९/१९९६ चे अधिसुचनेनुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६ (१) (अ) (ब) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करून पुढीलप्रमाणे अधिसुचना जारी करीत आहे. :–

प्रवेश बंद – १) अंबरनाथ पश्चिम शहरातील शास्त्री विदयालयाकडुन वुलनचाळ मधुन गैबनशहा दर्ग्याकडे जाणाऱ्या रस्त्यावर **शास्त्री विदयालय** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

पर्यायी मार्ग – सदरची वाहने शास्त्री विदयालय येथुन डी.एम.सी. चौक पुढे उजवीकडे वळण घेवुन कैलासनगर – फातीमा शाळा– वांद्रा पाडा– बेथल चर्च– कोहोज गाव कमान– येथुन गैबनशहा दर्ग्याचे समोरुन चिंचपाडा चौकाकडुन इच्छित स्थळी जातील.

सदर अधिसूचना दि.२७/०२/२०२६ रोजी ते दि.२१/०३/२०२६ रोजी पावेतो सायंकाळी १६.०० वा. ते रात्रौ २०.०० वाजे पावेतो अंमलात राहील.

सदर वाहतूक नियंत्रण अधिसूचना पोलीस वाहने, फायर ब्रिगेड, रुग्णवाहिका, ग्रीन कॉरीडोर, ऑक्सिजन गॅस वाहने व इतर अत्यावश्यक सेवेतील वाहनांना लागू राहणार नाही.

(पंकज शिरसाट)
पोलीस उप आयुक्त,
वाहतूक विभाग, ठाणे शहर

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा माहिती अधिकारी कार्यालय, ठाणे
२/– सदर अधिसूचना प्रसिध्द करण्यास विनंती आहे.

प्रत माहितीसाठी सादर,
मा. पोलीस आयुक्त, ठाणे शहर
मा. पोलीस सह आयुक्त, ठाणे शहर
मा. अपर पोलीस आयुक्त, पूर्व प्रादेशिक विभाग, कल्याण
मा. जिल्हाधिकारी, ठाणे
मुख्याधिकारी, अंबरनाथ नगरपरिषद, अंबरनाथ

प्रत कार्यवाहीसाठी :–
उप प्रादेशिक परिवहन अधिकारी, कल्याण
विभाग नियंत्रक, महाराष्ट्र राज्य परिवहन, कल्याण/विठ्ठलवाडी
पोलीस उपायुक्त, परिमंडळ–४, उल्हासनगर व विशेष शाखा, ठाणे
प्रत :– पोलीस उपायुक्त, आर्थिक गुन्हे, ठाणे शहर
२/– सदर अधिसूचना नागरीकांच्या माहितीसाठी ठाणे शहर पोलीस वेबसाईटवर प्रसिध्दी होणेस विनंती आहे.
प्रत :– समन्वय अधिकारी, ९ ए. एस. कक्ष, ठाणे
२/– सदर अधिसूचना पोलीस नोटीसमध्ये प्रसिध्दीसाठी.
प्रत :– सपोआ उल्हासनगर वाहतूक उपविभाग/पोनि अंबरनाथ वाहतूक उपविभाग, ठाणे शहर